भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०१/२०१७

**१) लोखंडी जाळयांची चोरी . :–**

दिनांक १५/०१/२०१७ चे १६.०० वा. ते दि. १७/०१/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील पीएमसीएल कंपनी पवनारखारी येथे मॅग्नीज पकडण्याकरीता लावलेल्या ०२ लोखंडी जाळया १०० कीलो कि. ३,०००/–रू चे कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी युवराज फागोजी राऊत वय ३७ वर्ष रा. पवनारखारी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारनावरून मुलाला ब्लेडने डाव्या हातावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०१/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील फिर्यादी चंद्रकांत कृष्णराव तांदुळकर वय ५० वर्ष, रा. पेट्रोलपंप ठाणा यांचा मुलगा आदीत्य चंद्रकांत तांदुळकर वय १७ वर्ष यास आरोपीने रोडावर बोलावुन वासाळया असे बोलुन चिडवीले असता तेव्हा फिर्यादीचे मुलाने आरोपीस मी तुलाही चीडवु का असे बोलले असता यातील आरोपीने रागाच्या भरात येउन आपल्या जवळील ब्लेड ने फिर्यादीचा मुलगा आदीत्य याचे डाव्या हातावर मारून दुखापत केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा जनबंधु पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) दारूडया वाहन चालकावर कारवाई:–**

दिनांक १८/०१/२०१७ चे १५.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील आटो क्र. एमएच ३६/५४५८ ही दारू पीउन दारूचे नशेत चालवीतांना मिहुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशीनव्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा कळमकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५ (१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना गजभीये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १८/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा येथील अवैध जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन कि. १५५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.